पोलीस अधिक्षक कार्यालय, जनसंर्पक विभाग धाराशिव.
“उमरगा पोलीसांची गुटखा विरोधी कारवाई.”

उमरगा पोलीसांची धडाकेबाज कारवाई :- अवैधरित्या इनोव्हा कार क्र. AP-23-L2478 मध्ये वाहतुक करीत असलेला 24 गोण्यातील हाय कंपनीचे 1296 पुडे ज्याची किमत 9,07,200 रूपये व गुटखा वाहतुकीसाठी वापरलेली किमत अंदाजे 7,00,000 रू. असे एकुण 16,07,200 रूपये किमतीचा मुद्देमाल केला जप्त.

आज दि. 16/10/2026 रोजी पहाटे पोलीस निरीक्षक प्रल्हाद सुर्यवंशी पोलीस ठाणे उमरगा यांना गुप्त बातमीदार मार्फत हैद्राबाद येथुन एक गजगा रंगाच्या इनोव्हा कारमध्ये अवैधरित्या गुटखा वाहतुक करीत असल्याची बातमी मिळाल्याने पहाटे 03:00 वाजता तलमोड चेक पोष्ट येथे नाकाबंदी लावण्यात आली. पहाटे 05:00 वाजण्याचे सुमारास बसवकल्याण कडुन एक इनोव्हा कंपनीची कार क्र. AP-23-L2478 ही येत असल्याचे दिसुन आल्याने नाकाबंदी ठिकाणी सदर गाडी अडवुन पाहणी केली कारचे पाठीमागील सीटवर पांढरे रंगाचे गोण्या भरल्याचे दिसुन आले. कार चालक मोहम्मद जमील मोहम्मद अहमद खान वय 32 वर्षे, रा. 1-28/1 मालरेड्डी, कोसगी मंडल, पोस्ट-कोसगी जि. महेबुबनगर ह.मु. शास्त्रीपुरम, राजेंद्रनगर मंडल जि. रंगारेड्डी (तेलंगणा) व त्याचा साथीदार अली खान S/O मोहम्मद अली वय 27 वर्षे, रा. प्लॉट न. 8, नुरी नगर, बांडलागुडा, पोष्ट-केशोगिरी, बांडलागुडा मंडल, जि. हैद्राबाद (तेलंगणा) यांना गोण्यामध्ये काय आहे याबाबत विचारपुस केली असता ते उडवाउडवीचे उत्तरे देवु लागल्याने पोलीसांना त्यांचा संशय आल्याने पोलीसांनी गोणी उघडुन पाहीले असता त्यामध्ये 'हाय' कंपनीचे गुटख्याचे पाकीटे असल्याचे दिसुन आल्याने सदर कार आतील मालासह पोलीस ठाणे येथे आणुन सदर बाबत अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य धाराशिव यांना माहिती दिली. तसेच मा. पोलीस अधीक्षक, मा. अपर पोलीस अधीक्षक व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरगा यांना माहिती दिली.

श्रीमती पल्लवी इंबडे अन्न सुरक्षा अधिकारी, धाराशिव यांनी आज दि. 16/10/2026 रोजी पो.स्टे. उमरगा येथे येवुन कारमध्ये मिळुन आलेल्या गुटखा सदृष्य अन्नपदार्थाची पंचनामा करून कारमध्ये मिळालेल्या 24 गोण्यातील 'हाय' कंपनीचे 1296 पुडे ज्याची किमत 9,07,200 रूपये व गुटखा वाहतुकीसाठी वापरलेली इनोव्हा कार क्र. AP-23-L2478 किमत अंदाजे 7,00,000 रू. असे एकुण 16,07,200 रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पल्लवी इंबडे यांनी आरोपी मोहम्मद जमील मोहम्मद अहमद खान वय 32 वर्षे, रा. 1-28/1 मालरेड्डी, कोसगी मंडल, पोस्ट-कोसगी जि. महेबुबनगर ह.मु. शास्त्रीपुरम, राजेंद्रनगर मंडल जि. रंगारेड्डी (तेलंगणा) व त्याचा साथीदार अली खान S/O मोहम्मद अली वय 27 वर्षे, रा. प्लॉट न. 8, नुरी नगर, बांडलागुडा, पोष्ट-केशोगिरी, बांडलागुडा मंडल, जि. हैद्राबाद (तेलंगणा) यांचेविरूध्द सरकार तर्फे फिर्याद दिलेवरून पो.स्टे. उमरगा गु.र.नं. 675/2026 कलम 123, 223, 274, 275 भारतीय न्याय संहिता, सहकलम 26 (2)(IV), 27 (3)(d), 27 (3)(e), 59 अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 प्रमाणे गुन्हा दाखल झालेला असुन गुन्हयाचा तपास पो.नि. प्रल्हाद सुर्यवंशी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, मा. अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपते यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रल्हाद सुर्यवंशी, पोउपनि रामहरी चाटे, पोहेकॉ/शिवलिंग घोळसगांव, पोकों/प्रविण नळेगावकर, पोकों/भागवत घाटे, होमगार्ड 1291 पुजारी, 917 पवार, 1281 राठोड, 1295 चौधरी यांच्या पथकाने केली आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस